## १९. क्षयरोग उपचार कार्यक्रमातील औषधांच्या कधीकधी होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती

(राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम)

| औषधाचे नाव | औषधापासून कधीकधी होणारा किरकोळ त्रास | औषधापासून कधीकधी होणारा जास्त त्रास | काळजी/ उपाय, सूचना इ. |
|---|---|---|---|
| आयसोनियाझिड | त्वचेवर पुरळ/गांध उठणे, त्वचा काळवंडणे, हातापायावर मुंग्या येणे, थोडी बधिरता येणे, झोप कमी होते. स्नायूचे भाग 'उडल्याप्रमाणे' होतात. | काविळ–यकृतविकार (औषध थांबवा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवा.) हातापायांच्यानसांचा आजार विशेषकरून कुपोषित मुले, दारूचे व्यसन असलेले आणि म्हातारे रुग्ण यांना होतो. सांधेसूज, मानसिक बदल, झटके इ. त्रास होऊ शकतो. | जीवनसत्त्व 'ब' पैकी पायरिडॉक्सिन गोळी (डोस १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनास रोज एक याप्रमाणे द्या. यामुळे त्वचा व नसांवर दुष्परिणाम होत नाहीत. |
| रिफामायसिन (R) | फ्लूप्रमाणे आजार येतो (ताप, थंडी, थकवा, अंगदुखी इ.) पोटात जळजळणे, लघवी लाल होते (घाबरण्याचे कारण नाही), त्वचेवर लालसरपणा/ खाज येते, पोट बिघडते. | श्वासोच्छवासाचा त्रास, श्वास/धाप लागणे, कावीळ–यकृतविकार, कधी कधी मूत्रपिंडावर परिणाम होतो. (लघवी कमी होते. | उपाशी पोटी घ्यावे, दोन तास आगेमागे काही खाऊ नये (पाणी चालते). यामुळे औषध चांगले लागू पडते. |
| पायराझिनामाईड | तोंडात 'लोखंडासारखी' चव येते, ढेकरा येतात, सांधे दुखतात. | यकृतविकार–कावीळ, सांधेसूज | असे त्रास झाले तर औषध थांबवा. औषध थांबवल्यावर त्रास बहुधा आपोआप थांबतो. |
| इथांबुटाल (E) | भूक मंदावते, मळमळ, डोकेदुखी, गोंधळल्याप्रमाणे मानसिक अवस्था, त्वचेवर वावडे उठणे इ. | दृष्टी कमी होते, लाल–हिरवा रंग दिसायचे कमी होते. पण हा त्रास औषध थांबवल्यावर ४–६ आठवड्यांनी थांबतो. या औषधाने कधी कधी पेनिसिलीनप्रमाणे रिॲक्शन येते. | दृष्टी अधू असलेल्या किंवा आधीच रंगांध असलेल्या व्यक्तीस देऊ नयी. तसेच फीट येणाऱ्यांना देऊ नका. |
| थायसिटाझोन | भूक मंदावणे, मळमळ, उलटी, कधी कधी ताप येतो. | त्वचेवर मोठमोठे पुरळ येतात, तोंडातही येतात.रक्तप्रमाण कमी होते, यकृत–मूत्रपिंड यांवर दुष्परिणाम होतो. | हा त्रास झाल्यास औषध थांबवा आणि रुग्णास प्राथमिक आरोग्य केंद्राकडे पाठवा |
| सेप्ट्रोमायसिन (S) इंजेक्शन | मळमळ, कानात गुणगुण आवाज, गरगरणे, त्वचेवर गांध उठते. | कानाच्या नसेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे श्रवणशक्ती कमी होते. यकृतावरपण परिणाम होतो. हातापायांच्या नसांवर अनिष्ट परिणाम होतो– मुंग्या येणे, बधिरणे इ. | गरोदरपणात औषध टाळा. खूप दिवस मध्यकर्ण किंवा अंतर्कर्णाचा आजार असल्यास देऊ नका. बरोबर नेहमी 'ब' जीवनसत्त्वाची गोळी द्या. |